

साळमधील खारफुटीच्या अतिवृद्धीवर कारवाईची मागणी
» पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



कार्लोस अल्काराज बनला 'फ्रेंच ओपन चॅम्पियन'
» पान ४ वर

वेर्णा, बुधवार, ११ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 279 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 11 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### ऑस्ट्रियाच्या शाळेत गोळीबार; ११ विद्यार्थ्यांचा मृत्यू

**व्हिएन्ना, दि. १०** : मंगळवारी सकाळी ऑस्ट्रियातील ग्राझ शहरातील एका हायस्कूलमध्ये गोळीबाराची घटना घडली. यामध्ये किमान ११ जणांचा मृत्यू झाला आणि २८ जण जखमी झाले. त्यापैकी किमान चार जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. काही जणांच्या डोक्यातही गोळ्या लागल्या आहेत.

पोलिसांनी परिसरात मोठी कारवाई सुरू केली आहे आणि लोकांना दूर राहण्यास सांगण्यात आले आहे. ऑस्ट्रियन मीडियाच्या वृत्तानुसार, सकाळी १० वाजता बोर्ग ड्रेयर्सचुत्झेंगासे हायस्कूलमध्ये गोळीबाराचा आवाज ऐकू आला. यानंतर लगेचच पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिस प्रवक्त्या साबरी योर्गुन यांनी सांगितले की, तिथे काय घडले हे शोधण्याचा पोलिस अजूनही प्रयत्न करत आहेत. सध्या घटनास्थळी स्पेशल फोर्स कोब्रा तैनात करण्यात आली आहे. ऑस्ट्रियाच्या गृहमंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की मृतांची खरी संख्या अद्याप उघड करता येणार नाही आणि जखमींची संख्या देखील पुष्टी करता येणार नाही. ऑस्ट्रियाचे चांसलर ख्रिश्चन स्टॉकर देखील ग्राझला रवाना झाले आहेत, जिथे ते पत्रकार परिषद घेण्याची योजना आखत आहेत.

---

### दिल्लीत घराला आग; ३ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली, दि. १०** : द्वारका सेक्टर तेरा मधील सबद अपार्टमेंट या निवासी इमारतीतील सातव्या मजल्यावर असलेल्या एका घराला आग लागली. आगीची झळ जाणवू लागताच घरात अडकलेल्या तीन जणांनी जीव वाचण्यासाठी थेट सातव्या मजल्यावरुन खाली उड्या मारल्या. हा निर्णय प्राणघातक ठरला. उड्या मारणाऱ्या तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका पुरुष आणि त्याची दोन मुले अशा तीन जणांचा समावेश आहे.

आग लागल्याची माहिती सकाळी दहा वाजून एक मिनिटांनी अग्निशमन दलाला मिळाली. माहिती मिळताच तातडीने अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळासाठी रवाना झाले. अग्निशमन दलाच्या एकूण आठ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. वाऱ्यामुळे आग झपाट्याने पसरली आणि पूर्ण सदनिकेने पेट घेतला. अग्निशमन दलाने तातडीने कारवाई करुन आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले आहे.

इमारतीमधील काही रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार आग लागली त्यावेळी सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना तातडीने माहिती देण्यात आली. पण पदाधिकाऱ्यांनी त्वरेने कोणताही निर्णय घेतला. यामुळे वेळ वाया गेला. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार आग प्रकरणी नियमानुसार चौकशी होईल आणि दोषींवर कारवाईची शिफारस केली जाईल.

---

### पंजाबमध्ये आंबेडकरांच्या पुतळ्याची तोडफोड

**होशियारपूर, दि. १०** : पंजाबमधील होशियारपूर जिल्ह्यातील नूरपूर जट्टान गावात डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्याची तोडफोड करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. बंदी घातलेल्या खलिस्तान समर्थक संघटना 'सिख्स फॉर जस्टिस' (एसएफजे) चा दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याने हा दावा केला आहे. आंबेडकरांच्या पुतळ्याला लक्ष्य करण्याची ही ८ दिवसांत दुसरी घटना आहे. यापूर्वी फगवाडाच्या फिल्लौर भागातही पुतळ्याची तोडफोड करण्यात आली होती. संघटनेचा प्रमुख गुरपतवंत सिंग पन्नूने या तथाकथित आयकॉनोक्लास्टिक हल्ल्या चे व्हिडिओ फुटेज जारी केले आहे. ज्यामध्ये असा दावा केला जात आहे की नूरपूर जट्टान गावातील आंबेडकरांच्या पुतळ्याचे हात कापले आहेत. ही घटना कटरने घडवून आणण्यात आली. पुतळ्याजवळ खलिस्तानचा झेंडाही ठेवण्यात आला होता आणि शीख हिंदू नाहीत आणि ट्रम्प झिंदाबाद सारख्या प्रक्षोभक घोषणाही देण्यात आल्या होत्या.

# डॉ. कुट्टीकर प्रकरण : गोमेकॉतील डॉक्टरांचा संप मागे

## मुख्यमंत्री डॉ .प्रमोद सावंत यांनी केले यशस्वी उपचार | डॉक्टरांच्या सात मागण्या मान्य

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १० : जीएमसी कॅज्युअल्टी विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांच्या आरोग्यमंत्र्यांनी केलेल्या जाहीर अपमानप्रकरणी सुरू झालेला डॉक्टरांचा संप मंगळवारी मागे घेण्यात आला. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी वैयक्तिक मध्यस्थी करत डॉक्टरांच्या सात प्रमुख मागण्या मान्य केल्याचे जाहीर केले. दरम्यान आरोग्यमंत्र्यांनी कॅज्युअल्टी विभागात येऊन आपली जाहीर माफी मागितली पाहिजे हा हट्ट डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांनी सोडून दिला .**

आरोग्य मंत्री विश्वजित राणे यांनी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.रुद्रेश कुट्टीकर यांच्या जाहीररित्या कॅमेऱ्यासमोर अपमान केल्यामुळे गेल्या चार दिवसांपासून तापलेले जीएमसीतले वातावरण शांत करण्यात अखेर मुख्यमंत्र्यांना मंगळवारी यश आले. त्या आधी सोमवारी मुख्यमंत्र्यानी डॉक्टर संघटनांच्या प्रतिनिधींशी अल्तिन्हो येथील निवासस्थानी सविस्तर चर्चा केली होती.मात्र आवश्यक वाटल्यास आपण स्वत: जीएमसीत जाऊ असे जाहीरही केले होते . त्यानुसार मुख्यमंत्री मंगळवारी जीएमसीत दाखल झाले आणि डॉक्टर प्रतिनिधींशी त्यांनी चर्चा केली. मुख्यमंत्र्यांचे उपचार संतापलेल्या डॉक्टरांना लागू पडले आणि त्यांनी संपावर जाणार नसल्याचे जाहीर केले. यावेळी डीन डॉ. शिवानंद बांदेकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश पाटील, गार्ड संघटनेचे अध्यक्ष आयुष शर्मा, तसेच डॉ. कुट्टीकर यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉक्टरांच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या सात मागण्यांवर सखोल चर्चा झाली आणि त्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या.

दरम्यान, आरोग्यमंत्री गोमेकॉत येऊन डॉ. कुट्टीकर यांची माफी मागावी, या आंदोलनकर्त्यांच्या सुरुवातीच्या प्रमुख मागणीवर मात्र मुख्यमंत्री सावंत यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलकांनी माघार घेतली. मुख्यमंत्री सावंत यांनी कॅज्युअल्टी विभागात वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तातडीने अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात केला जाईल, असे स्पष्ट केले. तसेच आरोग्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली, डीन यांचा समावेश असलेल्या विशेष समितीमार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख डॉ. मधू घोडकिरेकर यांनी यावेळी बोलताना, डॉक्टरांनी मांडलेल्या मागण्या या पूर्णपणे न्याय्य आणि व्यावसायिक सन्मान राखणाऱ्या आहेत, असे सांगितले. डॉ. कुट्टीकर यांनी आरोग्यमंत्र्यांकडून जाहीर माफी मागण्याची मागणी केली होती, ती वैयक्तिक नव्हती, तर पदाचा आणि संस्थेचा मान राखण्यासाठी होती,असेही त्यांनी स्पष्ट केले.

पान २ ▶






### डॉक्टरांच्या प्रमुख सात मागण्या:

- गोमेकॉतील व्हीआयपी संस्कृतीला आळा घालणे.
- अधिकृत व्हीआयपीसाठी मानक कार्यपद्धती तयार करणे.
- डॉ. कुट्टीकर अपमान प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करणे.
- आरोग्यमंत्र्यांकडून जाहीर माफीची मागणी.
- गोमेकॉ परिसरात व्हिडिओग्राफी व फोटोग्राफीवर बंदी.
- वैद्यकीय कर्मचाऱ्यांची भविष्यात होणारी सार्वजनिक निर्भत्सना रोखणे.
- कॅज्युअल्टीतील कर्मचाऱ्यांना सुरक्षा देणे, पोलिस चौकी स्थापन करणे व ५० पोलिसांची तातडीने नियुक्ती.

# जप्त केलेली दीड टन केळी सील तोडून पळवली!

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १०** : म्हापसा येथे अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने संशयास्पदरीत्या रासायनिक पद्धतीने पिकवलेली सुमारे दीड टन केळी जप्त केली होती. यासंदर्भात कारवाई करत अधिकाऱ्यांनी सदर साठा असलेले भाड्याचे गोदाम अधिकृतरित्या सील केले होते. मात्र, गोदाम मालकाने एफडीएचे सील तोडत केळ्यांचासाठा टेम्पोमध्ये भरून तो घटनास्थळावरून पसार झाला.

एफडीएच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही धक्कादायक घटना तपासादरम्यान उघडकीस आली. गोदामातील जप्त केलेली केळी मालकाने पणजी बसस्थानक परिसरातील आपल्या

भावाच्या मालकीच्या दुकानात हलवली होती. याची माहिती मिळताच एफडीएच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ त्या दुकानावर धाड टाकली आणि पुन्हा संपूर्ण साठा ताब्यात घेतला.

यानंतर जप्त केलेल्या संपूर्ण केळ्यांचा साठा अधिकृतरित्या नष्ट करण्यात आला असल्याची माहिती एफडीएने दिली आहे.दरम्यान, गोदाम मालकाला ताब्यात घेण्यात आलं असून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला स्थानिक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिकवण्यासाठी कोणते रसायन वापरले गेले, याची खात्री होण्यासाठी सध्या प्रयोगशाळेतील चाचणी अहवालाची प्रतिक्षा सुरू आहे. दरम्यान, साठा चोरी, सरकारी सील तोडणे आणि बेकायदेशीररीत्या रसायनांचा वापर करण्याच्या संभाव्य आरोपांखाली आरोपीविरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी अन्नसुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, अशा प्रकारचे अन्नपदार्थ विक्रीसाठी बाजारात येऊ नयेत यासाठी कारवाई सुरूच ठेवली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

# २.५९ कोटींच्या ड्रग्जसह तीन स्वीडिश नागरिकांना अटक

▶ **गोवा एएनसीची मोठी कारवाई**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : गोवा पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाने (एएनसी) अंमली पदार्थविरोधी मोहिमेदरम्यान २.५९ कोटी रुपयांच्या एलएसडी आणि केटामाइनसह तीन स्वीडिश नागरिकांना अटक केली आहे. ही कारवाई गोव्यात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या विदेशी नागरिकांविरोधात झालेली मोठी कारवाई मानली जात आहे.

एएनसी कडून मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या व्यक्तींकडून ४.८ ग्रॅम एलएसडी लिक्विड,७० एलएसडी ब्लॉट पेपर,४९.३ ग्रॅम लिक्विड केटामाइन आणि १.५ ग्रॅम केटामाइन पावडर हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. या जप्तीची एकूण किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात सुमारे रु. २,५९,६५,००० एवढी आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.



या प्रकरणी द्रियास लोरेन्झो कॅलिक (३९),सामी अँटेरो हिल्डेन टांस्कानेन (३६),आणि जोएल इमॅन्युएल कार्लस्ट्रॉम (३३) या तीन स्वीडीश नागरिकांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत हे स्पष्ट झाले आहे की, संबंधित विदेशी नागरिक मागील दोन वर्षांपासून गोव्यात परदेश मंत्रालयाच्या किंवा स्थानिक प्रशासनाच्या वैध प्रवास अथवा निवासी कागदपत्रांशिवाय राहत होते. त्यामुळे यांच्यावर एनडीपीएस कायदा तसेच भारतीय स्थलांतर (इमिग्रेशन) कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

या कारवाईबाबत माहिती देताना एएनसीच्या पोलीस अधीक्षक सुनीता सावंत म्हणाल्या की, आरोपी विदेशी नागरिकांची गोव्यातील उपस्थिती परवाना कालबाह्य झाल्यानंतरही सुरू होती. त्यांच्या बेकायदेशीर वास्तव्याची खात्री झाल्यामुळे त्यांच्याविरोधात आणखी गंभीर पातळीवर तपास सुरू करण्यात आला आहे.

गोवा पोलिसांकडून आरोपींच्या बॅकग्राउंडची सखोल चौकशी केली जात असून, त्यांच्या संपर्कात असलेले स्थानिक व परदेशी व्यक्तींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. यामागे आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ साखळीचा भाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

गोवा पोलिसांनी पुन्हा एकदा अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले असून, राज्यातील नशेच्या व्यसनाला खतपाणी घालणाऱ्या बेकायदेशीर घटकांविरोधात पोलिसांची मोहीम अधिक आक्रमक होण्याची चिन्हे आहेत.

# भंगार व्यावसायिकाचे भरदिवसा अपहरण

▶ **पांढऱ्या स्विफ्टमधून अज्ञातांनी जबरदस्तीने उचलले**

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १०** : फोंडा शहरालगतच्या जोफिलनगर येथे भरदिवसा घडलेल्या धक्कादायक घटनेत भंगार व्यवसायाशी संबंधित असलेल्या संदीप चौधरी (३८) यांचे काही अज्ञात व्यक्तींनी पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून अपहरण केले. ही घटना मंगळवारी दुपारी ३.१५ वाजता घडली असून, अपहरणकर्त्यांनी अतिशय नियोजनबद्ध आणि आक्रमक पद्धतीने कारवाई केल्याची माहिती पुढे येत आहे.

अपहरणाच्या घटनेचा तपशील असा आहे की, संदीप चौधरी हे आपल्या ऑफिसबाहेर एका मदतनीसासोबत बोलत असताना, अचानक एक पांढरी स्विफ्ट कार थांबली. त्या कारमधून उतरलेल्या अज्ञात व्यक्तींनी संदीप यांना जबरदस्तीने कारमध्ये ओढले आणि काही सेकंदांत घटनास्थळावरून पसार झाले. अपहरणकर्त्यांनी चौधरी यांच्या ऑफिसजवळ पार्क केलेली थार जीप देखील जाणीवपूर्वक पंक्चर केली होती, जेणेकरून संदीप पळून जाऊ शकणार नाही. फोंडा पोलिस स्थानकाचे निरीक्षक विजयकुमार कवळेकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित वाहनाचा माग काढण्यासाठी वेगवेगळ्या भागांमध्ये पथके तैनात करण्यात आली आहेत. पोलिसांनी फोंडा आणि आसपासच्या परिसरातील सीमेवर नाकाबंदी सुरू केली असून, अपहरणाच्या सर्व शक्यता आणि कारणांचा तपास केला जात आहे.

संदीप चौधरी हे आपल्या पत्नी आणि दीड वर्षाच्या मुलासोबत फोंड्यात राहत होते. मूळचे राजस्थान येथील चौधरी कुटुंब गेल्या तीस वर्षांपासून गोव्यात स्थायिक असून, त्यांच्या वडिलांनी येथे भंगार व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली होती.

पान २ ▶

# भारतीय विद्यार्थी अमेरिकेतल्या शिक्षणाला मुकणार?

**नवी दिल्ली, दि. १० :**

अमेरिकेत उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी सध्या मोठ्या अनिश्चिततेचा काळ सुरू आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने घेतलेल्या अलीकडील निर्णयांमुळे, अमेरिकेतील शैक्षणिक संधी मिळवण्याची प्रक्रिया अधिक कठीण आणि अनिश्चित झाली आहे.

मे महिन्यात ट्रम्प प्रशासनाने विद्यार्थी व्हिसा मुलाखती तात्पुरत्या स्थगित केल्या असून, अर्जदारांच्या सोशल मीडिया खात्यांची तपासणी करण्याच्या कठोर अटी लागू केल्या आहेत. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांमध्ये चिंता आणि तणावाचं वातावरण निर्माण झालं असून, यूएसऐवजी यूके, कॅनडा, जर्मनी आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या पर्यायांकडे कल

### ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांमुळे अस्वस्थता वाढली

वाढतो आहे.

ही कारवाई हार्वर्डसारख्या प्रतिष्ठित विद्यापीठांवरील आरोपांनंतर झाली आहे. ट्रम्प यांनी अशा विद्यापीठांवर अतिउदारमतवादी विचार आणि अँटीसेमिटिझमविरोधात ठोस भूमिका न घेणं यासंदर्भात टीका केली होती. त्यानंतर अमेरिकेतील दुतावासांना विद्यार्थ्यांच्या व्हिसासाठी अपॉइंटमेंट्स थांबवण्याचे आदेश देण्यात आले.

या धोरणाचा भारतीय विद्यार्थ्यांवर मोठा परिणाम झाला आहे. कारण, अमेरिका हे भारतीय विद्यार्थ्यांचे सर्वाधिक पसंतीचं गंतव्यस्थान राहिलं आहे. 'ओपन डोअर्स' संस्थेनुसार, २०२३–२४ मध्ये अमेरिकेत ११ लाखांहून अधिक आंतरराष्ट्रीय विद्यार्थी नोंदणीकृत होते, त्यातील ३.३ लाख विद्यार्थी भारतातून होते.



द इंडियन एक्सप्रेसच्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये अमेरिकेने ४१ टक्के भारतीय व्हिसा अर्ज नाकारले, जे दशकातील सर्वाधिक प्रमाण आहे. २०१४ च्या तुलनेत हे प्रमाण दुप्पटीने वाढलं आहे. विद्यार्थ्यांच्या व्हिसांवरील नियमांचे पालन तपासणाऱ्या 'सेविस' प्रणालीच्या माहितीनुसार, २०२५ च्या मार्चपर्यंत आंतरराष्ट्रीय विद्यार्थी नोंदणीत १० टक्के घट झाली आहे. अशा अनिश्चिततेत, अनेक विद्यार्थी आपले शिक्षण स्थगित करत आहेत किंवा इंग्लंड, जर्मनी, आयर्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या स्थिर पर्यायांकडे वळत आहेत.

अंतरराष्ट्रीय विद्यार्थी हे अमेरिकन विद्यापीठांसाठी आर्थिक आधारस्तंभ आहेत. विशेषतः विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित आणि मास्टर्स कार्यक्रमांना या विद्यार्थ्यांमुळे चालना मिळते. हे विद्यार्थी स्थानिक विद्यार्थ्यांपेक्षा अधिक शुल्क भरतात.

नाफसा या आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्था संघटनेनुसार, २०२३–२४ मध्ये परदेशी विद्यार्थ्यांनी अमेरिकन अर्थव्यवस्थेत ४३.८ अब्ज डॉलरचा वाटा उभा केला. यामुळे ३.७५ लाखांहून अधिक नोकऱ्यांना पाठबळमिळाले.

गेल्या अनेक दशकांपासून भारतातील हुशार विद्यार्थी अमेरिकन शिक्षणावर अवलंबून राहिले आहेत. कारण भारतात अद्यापही उच्च दर्जाच्या विद्यापीठांची कमतरता आणि संशोधनासाठी पूरक वातावरणाची अभाव आहे. त्यामुळेच अमेरिका भारतीय प्रतिभेला व्यासपीठ देत आली आहे. गुगलचे सुंदर पिचाई आणि मायक्रोसॉफ्टचे सत्या नडेला हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहेत, जे विद्यार्थी म्हणून अमेरिकेत गेले आणि आज जागतिक कंपन्यांचं नेतृत्व करत आहेत.

सध्या ज्या पद्धतीने ट्रम्प प्रशासन इमिग्रेशन धोरणे बदलत आहे, त्याचा भारतीय विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर खोलवर परिणाम होतो आहे. या अनिश्चिततेमुळे केवळ विद्यार्थ्यांचे नुकसान होत नाही, तर अमेरिकेच्या शैक्षणिक आणि आर्थिक पायाभूत रचनेवरही परिणाम होत आहे .